# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभाग, भिवंडी

## आर.टी.ई अंतर्गत दुर्बल व वंचित घटकासाठी २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०२१-२२

१. वेबसाईट : http:/student.maharashtra.gov.in (RTE Portal)-

२.Mobile App : Android Mobile मध्ये RTE PORTAL हे ॲप Playstore वरुन download करुन त्या ॲपव्दारेसुध्दा आवेदन पत्र भरता येतील

ऑनलाईन प्रवेश प्रक्रीयेसाठी :

१. फॉर्म भरण्याची मुदत : दि.३/३/२०२१ ते २१/३/२०२१

२. जन्मतारीख :

| अ.क्र | प्रवेशाचा वर्ग | जन्मतारीख | प्रवेशाचे वय |
|---|---|---|---|
| १ | Jr. K.G. | दि.१/०७/२०१६ ते १५/१/२०१८ | ३१/१२/२०२० रोजी ४ वर्षे पुर्ण |
| २ | Std. १st | दि.१/०७/२०१४ ते १५/१/२०१६ | ३१/१२/२०२० रोजी ६ वर्षे पुर्ण |

- अर्ज भरताना कोणतेही कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाचे नाहीत
- अर्ज भरताना कोणत्याही प्रकारच्या कागदपत्राच्या पडताळणी आवश्यकता नाही.
- अर्ज भरला म्हणजे प्रवेश मिळेल असे नाही, आपला अर्ज ऑनलाईन पध्दतीने निवड झाल्यानंतर, आपला प्रवेश अर्जामधील निवड झालेल्या शाळेत प्रवेश पात्र राहील.
- पालकांनी प्रवेश अर्ज भरताना, आपणास प्रवेश असलेल्या शाळा निवडावी. एकदा शाळेत प्रवेश ऑनलाईन लॉटरी पध्दतीने दिल्यानंतर शाळा बदलुन मिळणार नाही. तसेच प्रवेश विहीत मुदतीत न घेतल्यास आपला अर्ज ऑनलाईन पध्दतीमधुन अपोआप बाद होईल.
- निवड झाल्यास प्रत्यक्ष प्रवेशाचे वेळेस खालील दस्तऐवज आवश्यक आहेत. **सर्व कागदपत्रे अर्ज भरण्याची पुर्वीची असणे आवश्यक आहेत.**

| अ.क्र | कागदपत्राचा प्रकार | वैध कागदपत्रांची सुची |
|---|---|---|
| १ | निवासी पुरावा | निवासी पुराव्याकरिता रेशनिंग कार्ड, ड्रायव्हींग लायसन्स, वीज/ टेलीफोन देयक, प्रॉपर्टी टॅक्स/ घरपट्टी, गॅसबुक, पासबुक, आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट इ. यापैकी कोणताही एक पुरावा ग्राहय धरावा. तसेच शासनाने यापुर्वी अधिसुचना अथवा शासन निर्णयाव्दारे जाहीर केलेले पुरावे ग्राहय धरण्यात येईल. यापैकी कोणतेही एक. |
| | | १. घटस्फोटीत किंवा घटस्फोटीत निर्णय न लागलेल्या प्रकरणात न्यायालयाचा निर्णय अथवा घटस्फोटाचे प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्याचा पुरावा सादर केल्यास आईचा रहीवासी पुरावा ग्राहय धरण्यात येईल.<br>२.विधवा महीला यांच्या बालकांच्या बाबतीत योग्य पुरावा असल्यास आईचा रहीवाशी पुरावा ग्राहय धरण्यात येईल.<br>३.अनाथ बालकांच्या बाबतीत अनाथालयाची कागदपत्रे ग्राहय धरण्यात येतील. जर बालक अनाथालयात राहत नसेल तर आई-वडीलांचा मृत्यु दाखला अनिवार्य असुन, जे पालक सांभाळ करतात त्यांचे हमीपत्र आवश्यक राहील. |
| २ | जातीचे प्रमाणपत्र (वंचित गटाकरिता) | तहसीलदार/उपजिल्हाधिकारी/ उपविभागीय अधिकारी यांचे पाल्याच्या वडीलांचे प्रमाणपत्र |
| ३ | दिव्यांगाचे मुलासांठी वैद्यकीय प्रमाणपत्र पुरावा | जिल्हा शल्य चिकीत्सक/ वैद्यकीय अधिक्षक, अधिसुचित जिल्हा शासकीय रुग्णालय यांचे ४० टक्के पेक्षा जास्त दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र |
| ४ | मराठा आरक्षण | एस.इ.बी.सी. (मराठा आरक्षण) या प्रवर्गाचा समावेश **आर्थिक दूर्बल** गटात करावा |
| ५ | कुटुंबाचा उत्पन्नाचा दाखला | १.सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामध्ये आरटीई अंतर्गत प्रवेश घेताना विद्यार्थ्यांच्या पालकांचा सन २०१९-२० किंवा सन २०२०-२१ यावर्षाचा उत्पन्नाचा दाखला ग्राहय धरण्यात येईल. उत्पन्नाचा दाखल्याकरिता Salary slip, तहसीलदारचा दाखला, कंपनीचा किंवा Employer चा दाखला गृहीत धरावा.<br>२.घटस्फोटीत किंवा घटस्फोटीत निर्णय न लागलेल्या प्रकरणात न्यायालयाचा निर्णय अथवा घटस्फोटाचे प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्याचा पुरावा सादर केल्यास आईचा उत्पन्नाचा दाखला ग्राहय धरण्यात येईल.<br>३.विधवा महीला यांच्या बालकांच्या बाबतीत योग्य पुरावा असल्यास आईचा उत्पन्नाचा दाखला ग्राहय धरण्यात येईल.<br>४.अनाथ बालकांच्या बाबतीत अनाथालयाची कागदपत्रे ग्राहय धरण्यात येतील. जर बालक अनाथालयात राहत नसेल तर आई-वडीलांचा मृत्यु दाखला अनिवार्य असुन, जे पालक सांभाळ करतात त्यांचे उत्पन्नाचा दाखला आवश्यक राहील |
| ६ | जन्मदाखला | ग्रामपंचायत/ नपा/मनपा/यांचेकडील दाखला, रुग्णालयातील ANM रजिस्टरमध्ये रजिस्टरमध्ये नोंद केलेला दाखला , अंगणवाडी/ बालवाडीतील रजिस्टरमध्ये नोंद केलेला दाखला, आई वडील पालकांनी प्रतिज्ञापत्राव्दारे केलेले स्वयंनिवेदन, आधारकार्ड |

उपायुक्त
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका